जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in



६२ ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड,
सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.
ऑफिस मो. : ८२६२०५६४८०
मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१

❖ संस्थापक ❖
स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया

संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया
सहसंपादक : सौ. सुनंदा एस. चोरडिया

❖ वर्ष ५७ वे ❖ अंक ७ वा ❖ मार्च २०२६ ❖ वीर संवत २५५२ ❖ विक्रम संवत २०८२

या अंकात

| | पान नं. |
|---|---|
| ● ।। जिनेश्वरी ।। अध्याय ४ : असंस्कृत | १५ |
| ● रुणवाल एंथोरियम, मुंबई – उद्घाटन | २३ |
| ● प्राकृत : इंग्रजी डिक्शनरी – अकरावा खंड | २४ |
| ● सौ. सपना आनंदजी छाजेड – नगरसेविका | २५ |
| ● कव्हर तपशील | २६ |
| ● आओ! दुर्ध्यान छोडें!! – निद्रा ध्यान | ३१ |
| ● प्रतिक्रमण (उत्सव) | ३३ |
| ● त्रिरत्न | ३४ |
| ● अज्ञान तिमिर का नाश, होता जब ज्ञान-प्रकाश | ३९ |
| ● साधा जीवन – उच्च विचार | ४१ |
| ● छोटी सी बातें | ४२ |
| ● नफरत V/S प्यार | ४३ |
| ● श्री तिंवरी तीर्थ – राजस्थान | ४४ |
| ● लक्ष्य की ओर कदम बढ़ाना हैं | ४५ |
| ● बिन जाने कित जाऊँ – प्रश्नोत्तरी प्रवचन | ४७ |
| ● दिखावा नहीं चाहिए | ४९ |
| ● बैंक बेलेन्स : Reserve Bank | ५० |
| ● ऐसी हुई जब गुरुकृपा : चौकीदार कर | ५९ |
| ● जागृत विचार | ६० |
| ● मंत्राधिराज प्रवचन सार | ६१ |
| ● सुविचार | ६२ |
| ● विचारणीय प्रश्न – समाज धीरे धीरे समाप्त हो रहा हैं। | ६३ |
| ● साधु कौन? | ६४ |
| ● हास्य जागृती | ६५ |
| ● परिवार को मजबूत बनाने के मंत्र | ६६ |
| ● सूर्यदत्त ग्रुप, पुणे – राष्ट्रीय पुरस्कार | ६८ |
| ● नारीचे महत्त्व | ७१ |
| ● कुणी काहीही म्हटलं तरी | ७३ |
| ● वैराग्य वाणी | ७५ |
| ● बिखरे मोती | ७६ |
| ● कडवे प्रवचन | ७६ |
| ● जय आनंद ग्रुप, पुणे – पुरस्कार सोहळा | ७८ |
| ● सरहद पुणे | ८३ |

- व्यवसाय कर रद्द करावा ८४
- नेत्र चिकित्सा शिबीर – कासरवाडी ८४
- अरिहंत जागृति मंच, पुणे ८५
- गांधी गुरुजी – निबंध स्पर्धा ८५
- Passward – पासवर्ड ८६
- जीवन की पावर फुल बातें ८७
- सर्व विरति – स्वर्ण महोत्सव ८९
- लगाव नहीं अलगाव रखें ९१
- श्री. प्रकाशजी गांधी, पुणे – पुरस्कार ९२
- प्रा. सौ. सुरेखा कटारिया – पुरस्कार ९३
- श्री. राहुलजी–सौ. राखीजी छाजेड, पुरस्कार ९३
- प्रेरक कहानियाँ ९४
- सुरक्षा ९७
- विविध धार्मिक व सामाजिक बातम्या



**जैन जागृति – ''मॅगझिन पोस्ट'' सुविधेसह वर्गणीचे दर (महाराष्ट्र साठी)**

**✼ वार्षिक वर्गणी – रु. ८०० ✼ त्रिवार्षिक वर्गणी – रु. २३००**

**जैन जागृति – ''मॅगझिन पोस्ट'' सुविधेसह वर्गणीचे दर (महाराष्ट्र बाहेर)**

**✼ वार्षिक वर्गणी – रु. ९०० ✼ त्रिवार्षिक वर्गणी – रु. २६००**

**''मॅगझिन पोस्ट'' द्वारा बंद पाकिटातून मासिक घरपोच पोहचण्याची १००% हमी.**

या अंकाची किंमत ५० रु. • **Google Pay - M. 9822086997**

## सुसंस्कार व सदाचाराचा पुरस्कार करणाऱ्या 'जैन जागृति' मासिकाचे वर्गणीदार व्हा !

- आपण स्वत: जैन जागृतिचे ग्राहक बना व आपले नातेवाईक, मित्र, व्यापारी बंधू इत्यादींना वर्गणीदार नसतील तर त्यांना वर्गणीदार होण्यास सांगा. • 'जैन जागृति' मासिकाची वर्गणी भरून इतरांना भेट पाठवा.

जैन जागृति वर्गणी व जाहिरात – रोख/**Google Pay - M. 9822086997**/ **AT PAR** चेक/पुणे चेकने/**RTGS** इत्यादी द्वारा पाठवावी

**BANK ACCOUNT DETAILS - A/C Name : JAIN JAGRUTI**
**Bank : STATE BANK OF INDIA • Branch : Market Yard, Pune 37.**
**Current A/c No. : 10521020146 • IFS Code : SBIN0006117**



'जैन जागृति' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक एस. के. चोरडिया यांनी प्रकाश ऑफसेट, शॉप नं. १२–१३, पर्वती टॉवर्स, पुणे – ४११००९ येथे छापून ६२ बी, ऋतुराज सोसायटी, पुणे–सातारा रोड, पुणे – ४११ ०३७ येथे प्रसिध्द केले. संपादक – एस. के. चोरडिया

"Jain Jagruti" monthly magazine is owned, printed & published by S. K. Chordia, Printed at Prakash Offset, Shop No. 12-13, Parvati Towers, Pune 411009. Published at 62-B, Ruturaj Society, Pune - Satara Road, Pune - 411 037. Editor - S. K. Chordia


टिप : या अंकात प्रसिध्द झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. जैन जागृति संबंधित कोणत्याही कायदेशीर कारवाईसाठी पुणे न्यायलय क्षेत्र ग्राह्य धरले जाईल.

# श्रीमद् राजचंद्र मिशन धरमपूर के तत्त्वाधान में ''रुणवाल एंथोरियम'' मुलुंड, मुंबई में स्पिरिचुअल सेंटर का उद्घाटन



मुंबई : आध्यात्मिक क्षेत्र की प्रवृतियों में विस्तार हेतू श्रीमद् राजचंद्र मिशन धरमपूर के तत्त्वाधान में स्पिरिचुअल सेंटर का उद्घाटन रुणवाल एंथेरियम मुलुंड, एलबीएस रोड, मुंबई में पूज्य गुरुदेव राकेशजी के हाथों संपन्न हुआ । इस अवसर पर श्री. सुभाषचंद्रजी रुणवाल, चंदाजी रुणवाल, संदीपजी रुणवाल, सुबोधजी रुणवाल, संगीताजी ललवाणी, विकासजी ललवाणी, मेरोथॉन ग्रुप के चेतनजी शाह, महेशजी शाह, मुथा ग्रुप चेन्नई के सुरेशजी मुथा एवं मधुजी मुथा सहित कई गणमान्य उपस्थित थे ।

६ हजार स्क्वेयर फिट में बना मुलुंड स्पिरिचुअल सेंटर का उद्घाटन मुंबई शहर के लिए माईल स्टोन साबित होगा । मुलुंड के लिए रोशन की किरण के रुप में कल्पना किया गया, यह सेंटर चिंतन, सीखने और आंतरिक विकास के लिए एक जगह है । सेंटर में पूज्य गुरुदेवश्री के प्रवचन, विजडम रिट्रीट, होलिस्टिक वेलनेस प्रोग्राम, मेडिटेशन रिट्रीट, यूथ इनिशिएटिव, डिवाइनटच क्लासेस, योग, एरियल योग और साऊंड हीलिंग वर्कशॉप आयोजित किए जाएँगे ।

श्री आत्मसिद्धि शास्त्र के पैनल का भी अनावरण किया गया । इस उद्घाटन के साथ, मुलुंड स्पिरिचुअल सेंटर एक मार्गदर्शक प्रकाश के रुप में अपनी यात्रा शुरु करते हुए साधकों को जुड़ने, मनन करने और आध्यात्मिक मार्ग पर आगे बढ़ने के लिए उपयोगी सिद्ध होगा । परम पूज्य गुरुदेव राकेशजी ने रुणवाल परिवार का आभार प्रकट करते हुए कहा कि यह सेंटर वास्तव में धरमपूर जैसा ही बनाया है ।

रुणवाल परिवार सदा ही शिक्षा, चिकित्सा, साधर्मिक सेवा एवं धार्मिक कार्यों में अग्रणी रहा है । जिसकी जितनी अनुमोदना की जाय वो कम है । यह सेंटर खासकर युवाओं को आध्यात्मिक क्षेत्र की ओर आकर्षित करेगा । गुरुदेव का आगमन होते ही गुरुभक्तों ने गुरुदेव के जयकारें लगाते हुए उनसे आशीर्वाद लेने हेतु उमड पड़ा । ●

## धर्माच्या कॉलम मध्ये फक्त ''जैन'' लिहा

शाळा प्रवेश, कॉलेज प्रवेश, जन्म दाखल्याच्या वेळी किंवा विविध फॉर्म, अर्ज भरतांना त्या फॉर्ममध्ये जेथे धर्माचा कॉलम आहे, तेथे जैन बांधवानी फक्त ''**जैन**'' असे लिहावे.

बरेच लोक धर्माच्या कॉलमच्या पुढे श्वेतांबर जैन, दिगंबर जैन, मंदिरमार्गी जैन, स्थानकवासी जैन, हिंदू जैन, जैन हिंदू, हिंदू, ओसवाल जैन, पोरवाल जैन इ. असे लिहितांना दिसत आहेत. असे लिहिणे चुकीचे आहे. धर्माच्या कॉलमपुढे फक्त ''**जैन**'' लिहा. जैन धर्म हा स्वतंत्र व अती प्राचीन धर्म आहे. जैन धर्म कोणत्याही धर्माची शाखा किंवा उपशाखा नाही.

भारत सरकार व राज्य सरकार मार्फत धार्मिक अल्पसंख्याक समाजातील गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या दिल्या जातात. व इतर सवलती मिळतात. सरकारी कार्यालयातून धर्माचा दाखला मिळत नाही. जैन धर्मिय आहे हे ओळखण्यासाठी शाळेच्या लिव्हिंग सर्टिफिकेटमध्ये धर्माच्या कॉलममध्ये ''**जैन**'' लिहिणे आवश्यक आहे.

**जैन बांधवानी कोणताही फॉर्म भरताना धर्माच्या कॉलममध्ये ''जैन'' लिहा. – संपादक**

# प्राकृत – इंग्रजी डिक्शनरीचा अकरावा खंड प्रकाशनाच्या मार्गावर

**प्रेषक : डॉ. कौमुदी बलदोटा, सन्मति तीर्थ, पुणे**

नावातच भव्यता असलेला प्राकृत-इंग्रजी डिक्शनरीचा अकरावा खंड आता प्रकाशनासाठी सज्ज झाला आहे. या डिक्शनरीचे पूर्ण नाव आहे. 'अ कॉम्प्रेहेन्सिव अँड क्रिटिकल डिक्शनरी ऑफ दि प्राकृत लैंग्वेजेस विथ स्पेशल रेफरन्स टू जैन लिटरेचर.

नुकतीच सरकारने प्राकृत भाषेवर अभिजातत्वाची मोहोर उमटवली. ही डिक्शनरी प्राकृतच्या अभिजातत्वाचे नुसते जतन आणि संगोपन करीत नाही तर प्राकृत शब्दांचे प्रकटीकरण सुध्दा सातत्याने करीत आहे. प्राकृतच्या क्षेत्रातील मूलगामी कार्य म्हणजे ही डिक्शनरी.

प्राकृत डिक्शनरीच्या पहिल्या खंडापासून ते दहाव्या खंडापर्यंत स्वर-क-ख-ग-घ आणि च या अक्षरांनी सुरू होणाऱ्या प्राकृत शब्दांचा समावेश आहे. तर अकराव्या खंडात 'चा ते ज' या अक्षरांनी सुरू होणारे शब्द आहेत. या ११ खंडांसाठी लेटर साईजची जवळ जवळ ४८०० पृष्ठे खर्ची झाली आहेत. प्राकृत वर्णमालेच्या एक तृतीयांश काम आता पूर्ण झाले, हे जाहीर करण्यास आम्हाला खूप आनंद होत आहे. गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता, मुख्य संपादक डॉ. नलिनी जोशी यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली प्राकृत डिक्शनरी वेगाने तयार होत आहे.

यात प्रत्येक प्राकृत शब्दाचे संस्कृत प्रतिरूप, व्याकरण आणि इंग्रजी मध्ये अर्थ दिलेले आहेत. यासाठी जवळ जवळ सहाशे प्राकृत ग्रंथ आधारभूत मानलेले आहेत. ही पुस्तके प्राकृतचा अमूल्य ठेवा आहेत. प्राकृत भाषा म्हणजे स्वाभाविक बोली भाषा. प्राकृत भाषेच्या अर्धमागधी, शौरसेनी, महाराष्ट्री इत्यादी सातही मुख्य भाषा प्रकारांतील शब्दांचा यात समावेश आहे. आगम साहित्य, आगमांवरील टीकासाहित्य, कथावाङ्मय, चरित आणि काव्यसाहित्य, छंद, अलंकार, नाटकीय प्राकृत आणि व्याकरण अशा सर्व साहित्य प्रकारातील प्राकृत शब्दांना या प्रचंड महाकाय डिक्शनरीने आपल्या कवेत घेतले आहे.

द्रष्टे उद्योजक स्व. नवलमलजी फिरोदिया यांच्या कल्पनेतून साकारलेली आणि गत ४० वर्षांपासून ते आजतागायत सुप्रसिद्ध उद्योगपती डॉ. अभयजी फिरोदिया यांच्या भक्कम आर्थिक सहयोगावर हे 'शब्दशिल्प' साकार होत आहे. सन्मति-तीर्थ आणि भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने ती प्रकाशित होत आहे. सर्व समावेशक आणि व्यापक तरीही बारकावे आणि सूक्ष्मता जपणाऱ्या या प्राकृत-इंग्रजी डिक्शनरीच्या १२ व्या खंडाचे काम मोठ्या जोमाने सुरू झालेले आहे. •

**सदाचार व सद्विचारांच्या माध्यमातून ५७ वर्षे**
**अखंडपणे जिनवाणी व जैन समाजाची सेवा करणारे**
**भारत वर्षातील एक लोकप्रिय मासिक – जैन जागृति**

**मा. आमदार, राज्यमंत्री स्व. श्री. चंद्रकांतजी छाजेड यांची सून सौ. सपना आनंदजी छाजेड – पुणे मनपा नगरसेवक पदी विजयी**





पुणे मनपा औंध, बोपोडी प्रभाग क्र. ८ येथून भाजपा पक्षा तर्फे सौ. सपना आनंदजी छाजेड या प्रचंड मताने निवडून आलेल्या आहेत.

लोक नेता, जैन समाजातील राजकीय नेते, माजी आमदार व राज्यमंत्री स्व. श्री. चंद्रकांतजी छाजेड यांचा राजकीय प्रवास फार मोठा होता. ते सलग ३५ वर्ष नगरसेवक म्हणून पुणे मनपा मध्ये कार्यरत होते. १० वर्ष ते सभागृह नेते होते. तसेच महपौर पद भूषवून शहराच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे. २ टर्म ते आमदार म्हणून निवडून आले. राज्यमंत्री पदही त्यांना मिळाले. त्यांनी राज्यस्तरावर लोक कल्याणकारी अनेक योजना राबवल्या. प्रशासनावर त्यांची जबरदस्त पक्कड होती. जनसामान्य लोक त्यांचाकडे हक्काने काम घेवून जात असत व ते त्यांचे काम पूर्ण करत असत.

श्री. चंद्रकांतजी छाजेड यांचे सुपुत्र श्री. आनंदजी यांनी कार्य करताना आपल्या परिसराच्या विकासासाठी समर्पितपणे कार्य केले. नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांनी विश्वास आणि आपुलकीचे नाते निर्माण केले आहे.

या कार्यात त्यांच्या पत्नी सौ. सपना यांनी त्यांना मोलाची साथ दिली. सपनाजी या उच्चशिक्षित असून त्या लायन्स क्लबच्या अध्यक्ष होत्या. विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके व स्कुल बॅग वाटप करणे, त्यांना शिष्यवृत्ती देणे व त्यांच्या शिक्षणाला बळकटी देण्यासाठी हातभार लावणे हे कार्य त्यांच्याकडून घडतं. अनेक स्पर्धांमध्ये सपनाजींना जज्ज मधून निष्पक्षपातीपणाने कार्य केले. दोघांनी मिळून सामाजिक कार्यामध्ये वृद्धांना (ज्येष्ठ नागरिकांसाठी) आरोग्य शिबीरे राबवतात. स्त्रीयांच्या सक्षमिकरणा मध्ये हातभार लावतात.

श्री. आनंदजी छाजेड हे खडकी शिक्षण संस्थेचे चिटणीस आहेत. ते या कार्याचे मानधन केवळ २१ रुपये घेतात. गणपती उत्सवात मुर्ती वाटप एक पैसाही न घेता केले जाते. यावर्षी २१०० मुर्ती वाटप या दांम्पत्या कडून केले गेले. लोकांच्या गरजांचे उपक्रम राबविणे हा त्यांचा हातखंडा आहे. हे त्यांना वारसातून मिळालेली देणगी आहे.

छाजेड कुटुंबाची ५० वर्षांची राजकारणातील परंपरा ही सेवा, प्रामाणिकपणा आणि सामाजिक नेतृत्वाची गौरवशाली ओळख आहे. या समृद्ध वारशातून प्रेरणा घेत आनंदजी आणि संपनाजी छाजेड यांनीही त्यांच्या कार्याला बळ देत समाजसेवेची परंपरा पुढे नेली आहे. हार्दिक शुभेच्छा ! ●